# अनुभवपुष्पे

( चिंतनासाठी काही अनुभव-वचने )

भाग : १

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

# अनुभवपुष्पे

## भाग-१

( चिंतनासाठी काही अनुभव-वचने )

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** अनुभवपुष्पे - भाग १ ***
पुस्तकरूपाने प्रकाशित शेवटची आवृत्ती : ऑगस्ट २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

वाढती उलाढाल म्हणजे वाढता नफा असतोच असे नाही. प्रपंचाचेही तसेच आहे. हे लक्षात न येणारे लोक इस्टेटी, उद्योग, पदव्या, पैसा, मोठी सत्ता - यांच्यामागे पळत असतात. वास्तविक प्रपंचात उलाढालीपेक्षा समाधान - शांती हा खरा नफा.

तो ज्यांना कळला, ते एकतर असल्या पळापळींच्या मागे लागत नाहीत. नाहीतर खरा नफा वाढेल, एवढीच उलाढाल वाढू देतात !

गाडी प्रत्यक्ष सुरू झाल्यावरही काहींचे नक्की कुठे जायचे, ते योग्य आहे ना आणि कधी परतायचे हे ठरत नाही. त्यांचे प्रपंचही असेच निरुद्देश्य प्रवास करीत कुठल्या तरी मुक्कामावर संपतात !

जगण्याच्या संधीचे सोने करून, जिवाला शुद्ध करून ईश्वराकडे परत धाडणाऱ्या परमार्थाची, अशा प्रवाशांकडून कशी अपेक्षा करणार ?

जिज्ञासा स्वाभाविक असते. ती जगाकडे वळली तर प्रपंचज्ञान, विज्ञान, कर्तृत्व तसेच सूक्ष्म अहंकारही देईल, आणि म्हणून, मुक्त करणार नाही.

पण तीच जिज्ञासा ईश्वराकडे वळवली तर जरूर तेवढा प्रपंच सांभाळील, आत्मज्ञान देईल आणि मुक्तही करील !



खरेतर प्रत्येक माणूस खाणीतल्या हिऱ्यासारखा आहे.

काही पैलू पाडून घ्यायला तयार असतात आणि पैलू पडताना होणाऱ्या यातना संतोषाने सोसतात, म्हणून ते हिरे होतात !

अन्यथा तसे पाहिले तर, सर्व माणसे साररखीच आहेत आणि कुणालाही हिरे होणे शक्य आहे !





उपासनेचा संबंध आपल्या जीवनातल्या विधायक बदलांशी नसेल तर, प्रपंचातल्या इतर अनेक गोष्टींसारखी ती कुंडीतली शोभेची रोपे आहेत.

लोकांपुढे आपली प्रतिष्ठा वाढवणारी. कदाचित कुणी न पाहिलेल्या नव्या व्हरायटीची !

आणि दुर्दैवाने उपासनेत अनेकांना तेवढेच अपेक्षित असते !



अनेकांचे डोळे उघडे असतात, त्यांना दृष्टी असते, पण 'डोळे उघडलेले नसतात'.

त्यामुळे डोळे असूनही उद्धाराचे ध्येय दिसत नाही, उद्धारासाठी जे गरजेचे, ते पाहिले जात नाही, वाचले जात नाही.

त्यामुळे जीवनाची दुर्लभ संधी मिळूनही, उद्धार दूरच राहातो !

संतवचने हा आपला स्टँडर्ड टाइम आहे. त्याच्याशी लावलेली घड्याळे, प्रपंच व साधने तल्या वेगवेगळ्या स्टेशनवरचा आपला डिपार्चर टाइम दाखवतात.

आपल्याला सावध करतात, साधनेचे टप्पे बरोबर दाखवतात, घडवून घेतात.

अखेरच्या खऱ्या मुक्कामाचं अरायव्हल टाइमही सांभाळतात !

वडिलांची नुसतीच कीर्ती गाणाऱ्यांची गणना, जग शहाण्यात करीत नाही. पण त्यांच्यापासून प्रेरणा न घेणाऱ्यांचीही गणना जग शहाण्यात करीत नाही.

सुदैवाने ज्यांना असे कीर्तिमान पूर्वज लाभले त्यांनी कृतज्ञता म्हणून कीर्तीही गावी आणि प्रेरणा घेऊन अधिक उदंड कार्ये करावी यात शहाणपणही आहे आणि थोरपणही !



निर्गुण देव गाठायला सगुण साधने पूरक असतात. पण त्यांचा मेळ कळण्यात सामान्यांना अडचण येते. म्हणून साधने या अर्थाने त्यांत उणिवा निर्माण होतात.

त्यासाठी सगुण व निर्गुण दोन्हींही नीट समजून घेऊन साधने केली, म्हणजे त्यांत उणिवा रहात नाहीत.

निर्गुणाचे भान ठेवून सगुण साधन होते आणि समाधानही मिळते !





मनाबद्दल एवढे सतत सावध का राहायचे ?

तर पोटसुद्धा शरीराचा विनाश करणारे विष चुकून आत आले, तरी आपणहोऊन बाहेर फेकते.

पण आपल्यामधल्या माणुसकीचा व देवत्वाचा नाश करणारे विषासारखे विषय आत शिरले व घोळत राहिले, तरी मन सांगूनही बाहेर फेकत नाही, म्हणून सावध राहायचे !



माणसाला जमीन खरेतर उधार मिळालेली आहे. पण ती स्वकष्टाने मिळवली आहे या भ्रमात असल्याने नातीगोती, पैसा, फसवणुकी असे असंख्य गंभीर प्रश्न माणसाला पिढ्यान्‌पिढ्या जगाला भेडसावीत आहेत.

हा एक भ्रम दूर झाला तर, अगणित कायदे, नसलेले हक्क प्रस्थापित करण्याच्या यंत्रणा, खूप चांगल्या कामांसाठी वापरता येतील, नाही का ?

निर्जीव, कोऱ्या पडद्यावरची कृत्रिम सुखदुःखे तासन्‌तास पाहाणाऱ्या, त्यांच्याशी तादात्म्य होऊन ती जगणाऱ्या माणसांना निसर्गाची, शेजाऱ्यांचीच काय, अनेकदा घरातल्यांची सादही ऐकू येत नाही, ऐकायला वेळ राहात नाही.

हा निर्जीव पडद्यावरच्या कृत्रिम हालचालींचा विजय की माणुसकीचा पराजय ?

माझे भरपूर श्रवण झाल्यामुळे त्याची आता गरज नाही, हा अनेकदा सात्त्विक भ्रम असतो. ते जर तसे झाले असते, तर त्याचा योग्य उपयोग मननाने प्रत्यक्ष आचरणात उतरला असता. असे घडते तर, त्यात टिकून राहण्यासाठी, उलट पुन्हा उजळणीची गरज वाटते !

एखाददुसऱ्या धुण्यात कायमच्या स्वच्छ होणाऱ्या वस्त्राइतकी आपली चित्ते शुद्ध नसतात !



पैसा त्याच्या अगणित उपयोगांची आणि आधाराच्या आमिषाची - भूल जगाला घालतो. पण त्यामागचा सर्वनाशाचा गळ मात्र जगाला सहज दिसत नाही !

म्हणून पैशाच्या मागे लागून बळी गेलेलेच जगात जास्त दिसतात !

उलट तो गळ ओळखून, त्याच्यामागे न लागणारे, वेळी निर्धनही - समाधानात जगतात, समाधानात जातातही !



आरसा डोळे वटारीत नाही, पहाणाऱ्याने वटारलेले डोळे दाखवतो !

म्हणून जर स्वतःत सुधारणा नको असेल, तर आरशात पाहू नये.

हवी असेल तर मात्र, उगीचच आरशाला किंवा जगाला दोष देऊ नये !

स्वतःला सुधारणेच्या कामाला लागावे !

माणसाचे खरे कल्याण व काळजी निसर्ग आणि देव घेत असतात !

स्वतःचे कल्याण व काळजी आपण स्वतःच, जास्तीत जास्त आणि उत्तम घेऊ शकतो, हा एक भ्रम आहे.

तो एकदा दूर झाला की, आपले मूळ काम झाले !

आता फक्त तो परत होऊ नये म्हणून, सत्संग आणि साधनेत राहायचे !

सर्वांच्याच प्रपंचाच्या गोधड्या फाटक्या आहेत !

फक्त प्रतिष्ठितांच्या गोधड्यांची अस्तरे चांगली असतात. म्हणून त्या त्यांना कौतुकाच्या वाटतात.

इतरांनाही बहुधा त्या लांबूनच पाहायला मिळतात, म्हणून इतरांना त्या आपल्यापेक्षा अधिक आदर्श व आकर्षक वाटतात !

शरीर, प्रपंच, नातेवाईक, शेजारी, सहकारी, मालक, ग्राहक, राजसत्ता - यांच्याशी आपला नित्याचा संबंध आहे.

अशी ठिकाणे ही आपल्या तपश्चर्येची क्षेत्रे समजून जगण्याची ज्यांची तयारी असते, त्यांना यात्रांची यातायात करावी लागत नाही.

शिवाय पुण्य जास्त मिळते, ते वेगळेच !

तामस अन्न सोडून सात्त्विक अन्न खाणे, हा पहिला टप्पा आहे. पुढे सात्त्विकच पण बिनआवडीच्या वस्तू, पदार्थ बिनतक्रार खायला लागणे, हा दुसरा टप्पा आहे. त्या खाताना आनंद वाटणे, हा पुढचा टप्पा आहे. कुठलेच अन्न खाण्याची सक्ती न उरणे, हा त्याहीपुढचा टप्पा आहे !

परमार्थासाठीचे हे एक पूरक साधन आहे !

मनासारख्ये विलक्षण पेय नाही ! ते पशुत्व जागृत करू शकते ! त्याहीपेक्षा माणसाला, माणूस असल्याच्या भ्रमात ठेवून,प्रतिष्ठा, मान, लोकसंग्रह, पैसा, सात्त्विक कर्मे - अशा अनेक उपाधींची गुंगी आणू शकते !

पण निरुपाधिकतेची, सगुणाची परिसीमा गाठून, तेच पेय अमृतमय बनून, माणसाला देवत्व देऊ शकते !

कर्मे अपरिहार्य आहेत. त्याची सुरुवात हेतूने होते. पुढे साधने, परिस्थिती, पूर्वकर्मे, इतर माणसे - या साऱ्यांवर ती अवलंबून राहातात. म्हणून कर्मांची शुद्धता राखणे शक्य होईलच असे नाही.

यासाठी परमेश्वर कर्मांची परीक्षा व फळे हेतूवर ठरवतो. हेतू शुद्ध राखणे आपल्या अंतरंगाच्या शुद्धीवर आहे, त्यातल्या त्यात ते स्वाधीन आहे. तेवढे आपण राखावे !

ज्यांना 'मी' आणि 'माझ्या साऱ्याची' जपणूक व समृद्धी करण्यात आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता वाटते, असे लोक जगात बहुसंख्य आढळतात. त्यामुळे इतर लोकांच्या वाट्याला दैन्य आणि दुःखे येतात, हे लक्षात येऊन , त्यानुसार ते बहुसंख्य वागतील, तेव्हा जगात स्वास्थ्य नांदेल !

म्हणजे एका अर्थाने जगात स्वास्थ्य नांदण्याची शक्यता कमीच आहे !

भगवंताच्या इच्छेप्रमाणे अविरत खोदले म्हणजे, कृपेचे गोड पाणी लागते आणि दुसरीकडे भक्तीचे मळे फुलवण्यासाठी, सुपीक जमिनीवर पसरायला प्रेमळ मातीचे ढिगारेही मिळतात !

ते साधले आणि आलेली फळेफुले जनताजनार्दनाला वाटून, भगवत्स्मरणात आपण अलिप्त राहिले, की कर्मयोग साधला !

गुरूंनी सांगितलेले न करणारे आणि न सांगितलेले निष्ठेने करणारे - शिष्य अनेक असतात. त्याचे तीन दुष्परिणाम होतात - कमी शिष्य उद्धरतात, गुरूंचे अगणित श्रम वाया जातात आणि अश्रद्धांना गुरुमार्गाविरुद्ध डांगोरा पिटायला मोकळीक मिळते !

हे चित्र बदलायला हवेच, पण ते विवेकी, कृतिशील व खऱ्या शिष्यांनीच !



प्रार्थना जरूर काम करते, कुणासाठीही ! मात्र तिच्यासाठी काही पूर्वअटी आहेत, त्या पुऱ्या झाल्या तर !

ज्याला प्रार्थना करतो, त्याच्यावर अनन्य श्रद्धा, शरणागती, जी प्रार्थना करतो त्यातले निःस्वार्थीपण, ते व्हावे याची मनःपूर्वक तळमळ, पण परिणामांबद्दल मात्र शुद्ध निरपेक्षता !!





गुरूंना अपेक्षित परमार्थ शिकणे आणि आचरणे हीच शिष्यांची खरी साधना !

त्यासाठी पाच मार्ग आहेत - गुरूंचा प्रत्यक्ष तोंडी - लेखी उपदेश, त्यांचे गुणचरित्र, त्यांच्या तत्कालीन शिष्यांचे जीवन, त्यांच्या पश्चात झालेल्या शिष्यांचे जीवन आणि गुरूंच्या उपदेशाच्या आचरणाचे आपण केलेले प्रयोग !





खुरप्याने कष्ट करून तण, हरळी काढून स्वच्छ केलेल्या अंगणाकडे मध्ये बराच काळ लक्ष देता आले नाही की, कुठले कष्ट न घेता तण पुन्हा उगवून जागा भरून टाकते !

सत्संगाकडे मधल्या काळात दुर्लक्ष झाले की, चांगले निर्मळ झालेले चित्तसुद्धा आशा, असूया, क्षुद्र अपेक्षा, क्रोध - असे अनेक प्रकारचे दोष वाढून, पुन्हा गढूळ होते, हे कायम लक्षात ठेवावे !



बुद्धी कमी असली तर अपयश येते, घटनांचे अर्थ समजत नाहीत, अपमानाने नैराश्य येते. ते स्वतःला सहन होत नाही. शिवाय देव दुरावतो !

बुद्धी जास्त असली तर यश, स्तुती, अधिकार येतात- अहंकार होतो. तो जग सहन करीत नाही आणि देवही !

बुद्धीची देणगी कमी-जास्त असली तरी, देव प्राप्त करून देऊ शकते. पण समजुतीची मात्र परीक्षा घेते !

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची
(आता डिजिटल स्वरूपात)

१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी
२. हरिपाठपराग
३. दर्शन
४. कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट
५. साधनपदावली
६. जपसंकल्प : स्वरूप व पद्धती
७. अभंगसाधना
८. जाग
९. जीवनजिज्ञासा
१०. विचारविश्वाची ओळख
११. चैतन्यचिंतन
१२. किमया
१३. प्रसादकण
१४. ठेवा
१५. संतबोध : भाग १
१६. संतबोध : भाग २
१७. संतबोध : भाग ३

१८. वृत्त्यंतरप्रकाश
१९. नाम
२०. श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली
२१. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)
२२. उपासनेची नोंदवही
२३. उत्तरायण - भाग १
२४. शोध
२५. दिशा :
२६. उत्तरायण - भाग २
२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी
२८. बासरी
२९. उपासना :
३०. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी
३१. कृपापदावली भाग : १
३२. कृपापदावली भाग : २
३३. साधनपदावली भाग १
३४. सारविस्तार भाग : १

३५. साधनप्रेरणा
३६. मेरी यात्रा (हिंदी)
३७. बोधपाठ
३८. एकाध्यायी विचारगीता
३९. सृष्टिसंदेश
४०. गुरुतत्त्वतरंगिणी
४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत
४२. नाम (इंग्रजी आवृत्ती)
४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)
५५. शिदोरी
५६. विचारविसावा
५७. सारविस्तार भाग २
५८. महाराजांची शाळा
५९. साधनपदावली भाग २
६०. आरतीपुष्पमाला
६१. विनवणीची वाणी
६२. श्रद्धेची पहाट
६३. उपासनामाला

६४. पावनपथ
६५. अनुभवपुष्पे - भाग १
६६. कृतज्ञतामार्ग
६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात
६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी :
(मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)
६९. संतबोध : भाग ४
७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार
७१. उत्तरायण -भाग ३
७२. अनुभवपुष्पे - भाग २
७३. श्रद्धा
७४. अनुभवपुष्पे - भाग ३
७५. अर्घ्य
७६. जीवनचिंतन
७७. स्वास्थ्यसंवाद
७८. वचनांजली भाग १
७९. अक्षरायण
८०. वचनांजली भाग २
८१. भावगीता

# अनुभवपुष्पे

संवेदनशील व सावध व्यक्तींना
जगण्याच्या शाळेत पदोपदी सुगंधी भेटी मिळतात.....
विशालता, सत्याची झलक, पुढच्या प्रगतीच्या दिशा
आणि बरंच काही...
ती देणारी असंख्य छोटी छोटी अनुभवपुष्पंही...
संस्मरणीय... !